# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक :
०२०—२५६२११८८

**शैक्षणिक विभाग**
गणेशखिंड, पुणे—४११ ००७

वेबसाइट : www.unipune.ac.in
इ—मेल : affiliation@pun.unipune.ac.in

संदर्भ क्र. : सीए/६७६ दिनांक : २२, जून, २०२१

**कालमर्यादेचे व महत्वाचे**

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था
**अभियांत्रिकी/वास्तुशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापनशास्त्र,**
**विधी व शिक्षणशास्त्र/शारिरीक शिक्षणशास्त्र**

विषय : **अभियांत्रिकी/वास्तुशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापनशास्त्र, विधी व शिक्षणशास्त्र/शारिरीक शिक्षणशास्त्र** इ. व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांच्या/परिसंस्थांच्या शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ साठीच्या संलग्नता/मान्यता/नैसर्गिक वाढ सुरु ठेवण्याच्या/नूतनीकरणाच्या मान्यतेकामी माहिती स्वयं मूल्यमापन अहवाल (Self Appraisal Report) द्वारे माहिती सादर करणेच्या मुदतवाढीबाबत...

संदर्भ : १) विद्यापीठ पत्र क्र. सीए/६२७, दिनांक ११ जून, २०२१
२) विद्यापीठ पत्र क्र. सीए/६३७, दिनांक १५ जून, २०२१

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाबाबत प्राप्त आदेशानुसार कळविण्यात येते की, विद्यापीठाशी संलग्न/मान्यताप्राप्त अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापनशास्त्र, विधी, शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र इ. व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांच्या/परिसंस्थांच्या शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ साठीच्या संलग्नता/मान्यता/नैसर्गिक वाढ सुरु ठेवण्याच्या/नूतनीकरणाच्या मान्यतेकामीचा विषयांकित स्वयं मूल्यमापन अहवाल (Self Appraisal Report) हा आपल्या महाविद्यालयाच्या/परिसंस्थेच्या PUNCODE वर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या लिंकवर भरुन तसेच सदरहू अहवालातील मुद्यांमध्ये नमूद केलेली आवश्यक ती कागदपत्र सबंधित ठिकाणी Upload करुन केवळ ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यास दिनांक २० जून, २०२१ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. परंतु अद्याप बहुतेक महाविद्यालय/परिसंस्थांनी ऑनलाईन पध्दतीने अपलोड केलेले नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे **शुक्रवार, दिनांक २५ जून, २०२१ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.**

तसेच महाविद्यालये/परिसंस्था अहवाल सादर न केल्यास शैक्षणिक वर्ष २०२१–२०२२ करीता मा. संचालक, तंत्र शिक्षण विभाग, मुंबई यांना केंद्रीय प्रवेश प्रक्रियेकरीता पाठविण्यात येणा–या यादीमध्ये आपल्या महाविद्यालय/परिसंस्थाचे नाव कळविण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

कृपया याची सर्व सबंधितांनी योग्य ती नोंद घेऊन उक्त मुदतीत सबंधित अहवाल काळजीपूर्वक व प्राधान्याने भरुन केवळ ऑनलाईन पध्दतीने सादर करावेत.

कळावे,

(मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव

For Technical Query: 020-71533633, Email: collegesupport@pun.unipune.ac.in